# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाे.प्र.वि., मुंबई पहिली खबर क्र. ११/२०२३, वर्ष २०२३, दिनांक २६/०३/२०२३
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलमे Sections १३(१)(ई) सह १३(२)
   (ii) अधिनियम Act भा.द.वि. कलमे Sections १०९
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections
3. (a) अपराधाची घटना : वार ....., तारीख पासून १२/०३/२००८ वेळ ....., तारीख पर्यंत ०८/०३/२०२१ वेळ .....
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख १६/०३/२०२३, वेळ .....
   Information received at P.S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. १६/२०२३, तारीख १६/०३/२०२३, वेळ १२:२५
   General Diary Reference : Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा आलोसे यांची स्थावर व जंगम मालमत्ता असलेली ठिकाणे, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र.
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ....., ठिकाणाचे नंबर ....., गल्ली ....., रस्त्याचे नाव .....
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ....., गाव ....., पोस्ट ....., तालुका ....., जिल्हा ....., राज्य .....
   Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
   (c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ....., तालुका ....., जिल्हा ....., राज्य .....
   In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री अमोल शिंदे (b) वडीलांचे / पतीचे नाव श्री. बबन
   Father's /Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ३८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 8652040777
   Date of Birth & Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ....., दिल्याचा दिनांक ....., दिल्याचे ठिकाण ....., (f) व्यवसाय नोकरी
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion हिंदू ....., जात Caste ....., जनजाती Sub-Caste .....
   (h) पत्ता : ..... गल्ली / वॉर्ड नं. ..... घर / नाव नंबर ..... फोन /मो. नंबर ..... पॅन नं. ..... व्होटर्स नं. .....
   Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
   कुबेर को.हा.सो., फ्लॅट नं. १०२, प्लॉट नं. ८, सेक्टर २१, घणसोली, नवी मुंबई.
   रस्त्याचे नाव ....., जवळचे प्रसिद्ध ठिकाण ....., गाव ....., पोस्ट ....., पो. स्टे. .....
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ....., जिल्हा ....., राज्य ....., सध्याचा पत्ता .....
   Taluka Distt. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. खा. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अधिकारीला यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   व्यव. नोकरी (कनिष्ठ अभियंता, मुंबई
   १) नरेंद्र बल्लाकर भोईर, वय - ५३ वर्षे, रा.ठि. २०३, लक्ष्मी नारायण रेसिडेन्सी, पोखरण रोड नं. २, ठाणे (प)
   महानगर पालीका, व्यवसाय - डॉक्टर (स्त्रीरोग तज्ञ), वैद्यकिय अधिकारी,
   २) सौ. शिल्पा नरेंद्र भोईर, वय - ५०, ठाणे महानगर पालिका, ठाणे. रा.ठि. वरील प्रमाणे

Scanned with

१७/०३/२०२३

फिर्याद

श्री० अमोल बबन शिंदे, वय ३९ वर्षे, व्यवसाय - नोकरी (पोलीस निरीक्षक, पटप), रा. ठि. कुबेर को. हा. सो., फ्लॅट नं. १०८ प्लॉट नं. ०८, सेक्टर नं. २१, घणसोली, नवी मुंबई यांचा सविस्तर जबाब दि. १७/०३/२०२३ रोजी संगणीकृत करण्यात आला असून तो सोबत जोडला असून तोच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(हर्षल चव्हाण)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला० प्र० वि. मुंबई विभाग

**प्रथम खबरी जबाब** दिनांक :— १७/०३/२०२३.

श्री अमोल बबन शिंदे, वय ३९ वर्षे, व्यवसाय — नोकरी (पोलीस निरीक्षक, एटप), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, सरपोचखानावाला रोड, वरळी मुंबई —४०० ०३०, मो.क्र. ८६५२०४०७७७

---

मी वरील प्रमाणे असुन, दिनांक ३१/०८/२०१९ रोजी पासुन मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई लाप्रवि, वरळी, मुंबई येथे एक टप्पा पदोन्नतीवर पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

ला.प्र.वि., मुंबई विभाग येथे तक्रारदार अब्दुल्ला असदऊल्ला खान यांचे लेखी तक्रारीवरून आणि पंचसमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई वरून यातील गैरअर्जदार लोकसेवक नरेंद्र रत्नाकर भोईर, कनिष्ठ अभियंता (इमारत व कारखाने) 'एल' वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, कुर्ला (प) यांनी रु. ५०,०००/— लाचेची मागणी यातील तक्रारदार यांचेकडे केल्याचे निष्पन्न झाल्याने गैरअर्जदार लोकसेवक नरेंद्र भोईर यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक १५/०३/२०१४ रोजी गु.र.क्र. २२/१४ कलम ७, १३(१)(ड), १३(२) भ्र.प्र.अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने दिनांक १८/०३/२०१४ रोजी कुर्ला रेल्वे स्थानक (प), मुंबई येथे आयेजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान गैरअर्जदार लोकसेवक नरेंद्र रत्नाकर भोईर यांनी कुर्ला रेल्वे स्थानक (प) येथे तक्रारदार यांचेकडून एकूण लाच रक्कमेचा पहिला हफ्ता रु. २०,०००/— स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले व नमुद गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली.

त्याअनुषंगाने गैरअर्जदार लोकसेवक नरेंद्र रत्नाकर भोईर यांचे राहते घराची घरझडती घेतली असता नमुद घरझडतीमधील मालमत्तेच्या/अपसंपदेच्या अनुषंगाने आणि प्रस्तुत सापळा प्रकरणामुळे गैरअर्जदार नरेंद रत्नाकर भोईर यांचे मालमत्ता/अपसंपदेची चौकशी करण्याबाबत मा. महासंचालक, लाप्रवि. म.रा. मुंबई यांचे आदेशान्वये जा.क्र ६१८४/लाप्रवि/मुवि/उघड चौकशी क्र ३३/२०१६, दिनांक ०४/०६/२०१६ रोजी गैरअर्जदार नरेंद रत्नाकर भोईर यांचेविरुध्द उघड चौकशी क्र. ३३/२०१६ अन्वये उघड चौकशी लाप्रवि मुंबई येथे सुरु करण्यात आली.

उघड चौकशीचे आदेश प्राप्त होताच प्रथम चौकशी अधिकारी सपोआ ठोंबरे, लाप्रवि, मुंबई नमुद उघड चौकशी मध्ये गैरअर्जदार नरेंद रत्नाकर भोईर व त्यांची पत्नी शिल्पा भोईर यांचा नमुद चौकशी मध्ये परिक्षण कालावधी हा गैरअर्जदार लोकसेवक म्हणून मनपामध्ये नोकरीस लागल्याचा दि. १२/०३/२००७ पासून ते यशस्वी सापळा कारवाई दि. १८/०३/२०१४ पर्यंत निश्चित केला व नमुद उघड चौकशी मध्ये गैरअर्जदार नरेंद रत्नाकर भोईर व त्यांची पत्नी शिल्पा भोईर यांच्या मालमत्तेबाबत संबंधीत व्यक्तीचे जबाब, विविध शासकिय निमशासकीय आस्थापना यांना पत्रव्यवहार करून व त्याबाबत माहिती प्राप्त करून उपलब्ध केलेल्या कागदपत्रांचे, गै.अ. नरेंद रत्नाकर भोईर व त्यांची पत्नी शिल्पा भोईर यांनी चौकशी दरम्यान सादर केलेले कागदपत्रे, दिलेले जबाब व इतर प्राप्त माहिती यावरून त्यांच्या उत्पन्न, खर्च व मालमत्ता यांची एकत्रिक चौकशी केली असुन त्याबाबतचे सविस्तर विवरण आणि कौटुंबिक माहिती तसेच गै.अ. व त्यांच्या पत्नीचा नोकरीचा इतिहास खालीलप्रमाणे.

**<u>गै.अ. लोकसेवक नरेंद्र रत्नाकर भोईर यांची माहिती :—</u>**

गै.अ. यांचा जन्म दि. २२/०५/१९७० रोजी मुळ गांव काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे या ठिकाणी झाला. त्यांनी सन २००० साली मुंबई विद्यापीठातुन स्थापत्य अभियांत्रिकी मध्ये पदवी प्राप्त केली. तद्नंतर ते 'सुशिक्षित बेरोजगार अभियंता' म्हणून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण बांधकाम विभाग, ठाणे येथे व महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे येथे कंत्राटदार म्हणून नोंदणी केली व कंत्राट घेऊ लागले. सदर व्यवसाय ते फेब्रुवारी २००७ पर्यंत करत होते.

गै.अ. यांची दि. १२/०३/२००७ रोजी विहीत मार्गाने निवड होवुन कनिष्ठ अभियंता म्हणून ते बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये नोकरीस लागले. नियुक्ती झाल्यापासून ते सहाय्यक आयुक्त, एल विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, तिसरा मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.ग्रे.बर्वे मार्ग, कुर्ला (प) मुंबई ७० येथे बिल्डींग डिपार्टमेंट येथे कार्यरत आहे. सदर 'एल' वार्ड मध्ये ते १२/०३/२००७ पासून ते १८/०३/२०१४ (दि.

Scanned wit

श्री. अमोल बबन शिंदे यांचा दिनांक १७/०३/२०२३ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु.....

११/०२/२०११ ते दि.२१/१०/२०१३ या कालावधीत रेल्वे अपघात झाल्याने वैद्यकिय रजेवर) पर्यंत कनिष्ठ अभियंता म्हणुन कार्यरत होते.

**-: गै.अ. नरेंद्र रत्नाकर भोईर यांची कौटुंबिक माहिती:-**

पत्नी :- गै.अ. यांचा सन २००१ साली श्री. गणपत गोसावी, रा.ठी. मु.पो. मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग यांची मुलगी डॉ. शिल्पा गणपत गोसावी, MD, D.G.O (स्त्रीरोग तज्ञ) हिचेशी विवाह झाला. गै.अ. यांची पत्नी डॉ शिल्पा नरेंद भोईर या ठाणे महानगर पालिका मध्ये वैद्यकिय अधिकारी या पदावर दि. ११/०८/२००४ पासून कार्यरत आहेत. त्या वैद्यकिय अधिकारी संवर्ग-१ या पदावर कोपरी प्रसुतिगृह येथे स्त्रीरोग तज्ञ म्हणून नेमणुकीस आहे. त्या सकाळी ०९.३० ते १.०० पर्यंत कार्यरत असतात त्यानंतर ऑनकॉल असतात. गै.अ. यांची पत्नी ठाणे महानगर पालिकेकडून व्यवसाय रोध भत्ता घेत नसल्याने त्या खाजगी व्यवसाय (प्रायव्हेट प्रॅक्टीस) करु शकतात. म्हणुन त्या १) वेदांत हॉस्पीटल ठाणे, २) ऑर्थो नोवा हॉस्पीटल, ठाणे, ३) गोपीरत्न हॉस्पीटल, काल्हेर, भिवंडी. ४) निरामय हॉस्पीटल, ठाणे ५) साईधाम हॉस्पीटल, ठाणे ६) साईनाथ हॉस्पीटल, ठाणे या हॉस्पीटल मध्ये कन्सल्टींग करत आहेत. तसेच इमरजन्सी कॉल प्रमाणे इतर हॉस्पीटलमध्ये सुध्दा असीस्टंट गायनॉकॉलॉजीस्ट म्हणून काम करत आहे.

वडिल :- गै.अ. यांचे सांगण्याप्रमाणे वडील नामे श्री रत्नाकर दगडू भोईर, वय ७१ वर्षे, हे जिल्हा परिषद, ठाणे येथे शिपाई म्हणून नोकरीस होते ते दि. ३१/०५/२००७ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे दुर्गेश दीप सोसायटी, बिल्डींग नं. ४, काल्हेर, ता. भिवंडी जि. ठाणे येथे स्व:ताचे घर असून राहाते गावी वडीलोपार्जित शेती व घर आहे.

आई :- गै.अ. यांची आई श्रीमती गोपीका रत्नाकर भोईर, वय ६८ वर्षे हि गृहिणी असून त्या मु.पो. काल्हेर, ता. भिवंडी जि. ठाणे याठिकाणी शेती करतात.

भाऊ :- गै.अ. यांना एक लहान भाऊ व एक लहान बहिण आहेत त्यांची लग्ने झालेली आहेत. भाऊ नामे श्री. प्रशांत रत्नाकर भोईर, वय ४० वर्षे हा मु.पो. काल्हेर, ता. भिवंडी जि. ठाणे येथे वडीलांसोबत रहात असून तो डॉक्टर आहे. सध्या तो काल्हेर ता. भिवंडी जि. ठाणे येथे गोपीरत्ना हॉस्पीटल चालवितो. तसेच बहिण नामे सौ. रंजना किशोर चुणेकर हि गृहिणी असून ती तिच्या पती सोबत कळवा, जि. ठाणे येथे राहावयास आहे.

मुले :- गै.अ. यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांना एक मुलगी नामे कु जिज्ञासा, वय १२ वर्षे व मुलगा नामे कु. विघ्नेश, वय ०६ वर्षे अशी दोन अपत्ये आहेत. मुलगी कु. जिज्ञासा हीचा जन्म दि. ०९/०३/२००२ रोजी झाला असून ती १ ली ते १२ वी पर्यंतचे शिक्षण सुलोचनादेवी सिंघानिया स्कुल, के.जे ग्राम वर्तक नगर, ठाणे पश्चिम येथे शिकत आहे. मुलगा नामे कु. विघ्नेश याचा जन्म दि. २०/०४/२००७ रोजी झाला असून त्याचे १ ली ते १० वी पर्यंतचे शिक्षण सुलोचनादेवी सिंघानिया स्कुल, के.जे ग्राम वर्तक नगर, ठाणे पश्चिम येथे शिकत आहे.

**गै.अ यांचा नोकरीचा इतिहास:-**

गै.अ. यांनी दि. १२/०३/२००७ रोजी विहीत मार्गाने निवड होवून कनिष्ठ अभियंता म्हणून ते बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये नोकरीस लागले. नियुक्ती झाल्यापासून ते सहाय्यक आयुक्त, एल विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, तिसरा मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प) मुंबई ७० येथे बिल्डींग डिपार्टमेंट येथे कार्यरत आहे. सदर 'एल' वार्ड मध्ये ते १२/०३/२००७ पासून ते १८/०३/२०१४ (दि. ११/०२/२०११ ते दि.२१/१०/२०१३ या कालावधीत रेल्वे अपघात झाल्याने वैद्यकिय रजेवर) पर्यंत कनिष्ठ अभियंता म्हणुन कार्यरत होते.

श्री. अमोल बबन शिंदे यांचा दिनांक १७/०३/२०२३ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु.....

**परिक्षण कालावधी:-**

वरील गुन्हयावरुन उघड चौकशीचा परिक्षण कालावधी हा गै.अ. लोकसेवक म्हणून मनपामध्ये नोकरीस लागल्याचा दि. १२/०३/२००७ पासून ते दि. १८/०३/२०१४ यशस्वी सापळा कारवाई हा गृहित धरण्यात आलेला आहे.

**गैरअर्जदार व त्यांची पत्नी यांचे प्राप्त माहितीवरून उत्पन्न, खर्च व मालमत्ता यांची एकत्रिक चौकशी केली असुन त्याबाबतचे सविस्तर विवरण खालीलप्रमाणे आहे.**

**गैरअर्जदार श्री.नरेंद्र भोईर यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशिल**

**(अ) – श्री. नरेंद्र भोईर यांची परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता– रु. २,१२,१३५/–**

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | परिक्षण कालावधी पूर्वीची बँकांतील शिल्लक रक्कम | २,१२,१३५ |
| २ | श्री. साई दर्शन को.ऑ.हौ. सोसा, रुम नं. २०२, काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे | ० |
| ३ | सागर अपार्टमेंट, फ्लॅट नं. १, काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे | ० |
| ४ | सागर अपार्टमेन्ट, फ्लॅट नं. २, काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे | ० |
| ५ | सागर अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३, काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे | ० |
| ६ | फ्लॅट नं. ००२/४, हस्तीनी विपाशा बिल्डींग, दुर्गेश दिप कॉम्पलेक्स, काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे | ० |
| | एकुण | २,१२,१३५ |

**(ब)– श्री. नरेंद्र भोईर यांची परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता– रु. २६,५४,२१५/–**

| अ.क्र. | तपशील | रूपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं. ई/०२०३, लक्ष्मी नारायण रेसीडेंन्सी खरेदी | १७,००,००० |
| २ | बँक खात्यातील शिल्लक रक्कम | ८६,९९२ |
| ३ | एच.डी.एफ.सी. लाईफ पॉलीसीमध्ये केलेली गुंतवणूक | २,००,००० |
| ४ | एल.आय.सी. पॉलीसीमध्ये केलेली गुंतवणूक | १,५१,६५८ |
| ५ | सोने खरेदी | ९६,२६७ |
| ६ | एच.डी.एफ.सी. बँकेतील मुदत ठेवी | ९०,१४८ |
| ७ | एफ.डी. मध्ये केलेली गुंतवणूक | २५,००० |
| ८ | घर झडतीमधील चल–अचल मालमत्ता | ३,०४,१५० |
| | एकूण स्थावर/जंगम मालमत्ता | २६,५४,२१५ |

**(क) – श्री. नरेंद्र भोईर यांचे परिक्षण कालावधीतील उत्पनाचा तपशिल – रु. २९,९०,४६७/–**

| अ.क्र. | उत्पन्न | रूपये |
|---|---|---|
| १ | निव्वळ वेतन | १०,५२,२७७ |
| २ | फ्लॅट नं. ई/०२०३, लक्ष्मी नारायण रेसीडेंन्सीसाठी गृहकर्ज | १७,००,००० |
| ३ | बँकातील बचत खात्यावर मिळालेले व्याज | २८,६१० |
| ४ | ठाणे जि.म.स. बँक मध्ये ठेवलेल्या मुदतठेवीवरील मिळालेले व्याज | ४,६२६ |
| ५ | हेल्थ इन्सुरन्सची मिळालेली रक्कम | ७४,७७७ |
| ६ | पत्नी शिल्पा हिच्याकडुन धनादेशाव्दारे मिळालेली रक्कम | १,२४,००० |
| ७ | एचडीएफसी बँकेतील (आर.डी.) आवर्ती ठेवी | ६,१८० |
| | एकूण | २९,९०,४७० |



Scanned wit

श्री. अमोल बबन शिंदे यांचा दिनांक १७/०३/२०२३ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु.....

**(ड)– श्री. नरेंद्र भोईर यांच्या खर्चाचा तपशिल –** रु.२३,३१,१७७/–

| अ.क्र. | तपशील | रूपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं. ई/०२०३, लक्ष्मीनारायण रेसीडेन्स गृहकर्ज परतफेड | १०,८९,६६६ |
| २ | मालमत्ता कर खर्च श्री साई दर्शन प्लॅट न.२०२ :– | ४,६३५ |
| ३ | श्री प्रदिप साळवी यांना धनादेशाव्दारे दिलेली रक्कम | ५,८१,००० |
| ४ | वडिल श्री.रत्नाकर भोईर यांना धनादेशाव्दारे दिलेली रक्कम | ४,२२,३८० |
| ५ | एच.डी.एफ.सी. व एन.के.जी.एस.बी. बॅकेमधुन केलेला खर्च रक्कम | १,०९,३८३ |
| ६ | गै.अ. यांनी इतर कारणाकरीता केलेला खर्च | १,२४,११३ |
| | एकूण | २३,३१,१७७ |

**(इ) श्री.नरेंद्र भोईर यांचे नाकारण्यात आलेले उत्पन्न–** रु.४,९०,६००/–

**नाकारण्याची कारणे:–** गै.अ. नरेंद्र भोईर यांनी साई दर्शन अपार्टमेंन्ट काल्हेर, भिवंडी, ठाणे येथील त्यांचे व पत्नीचे नांवे असलेले रूम वेगवेगळ्या भाडेकरुना परिक्षण कालावधीमध्ये भाडेतत्वावर ११ महिण्यासाठी दिले व त्यासाठी त्यांनी भाडे कराराच्या छायांकित प्रती चौकशी दरम्यान सादर केलेल्या आहेत. सदर भाडे करार हे रू १००/– च्या स्टॅम्प पेपरवर केलेले असून ते नोटरी अथवा रजिस्टर केलेले नाहीत. तसेच रु.४,९०,६००/– त्या–त्या भाडे कराराप्रमाणे त्यांना मिळालेले रोख स्वरूपातील भाडे असुन भाडे करारनामे तपशीलवार नाहीत. तसेच करारनाम्यावर साक्षिदारांचे नांव पत्ते व सहया नाहीत, अनामत रक्कम नमुद नाही तसेच करारपत्र अर्धवट आहे. लोकसेवक श्री नरेंद्र भोईर यांनी दिलेल्या दि. १७/११/१४ रोजीच्या पत्रा प्रमाणे त्यांना मिळालेले भाडे रोख स्वरूपात कि चेकव्दारे मिळाले? किंवा कोणत्या बॅक खात्यात जमा झाले याबाबत गै.अ. माहिती दिली नाही. तसेच करारनाम्याप्रमाणे मिळालेले भाडे रू ४९०६०० असून पत्राप्रमाणे दिलेली भाडयाची रक्कम यामध्ये तफावत असुन गै.अ. यांनी सदरबाबत समाधानकारक स्पष्टीकरण दिलेले नाही म्हणुन सदर रु.४,९०,६००/– भाडेपोटी मिळालेली रक्कम नाकारण्यात आली..

**गै.अ. यांची पत्नी डॉ. शिल्पा नरेंद्र भोईर यांची मालमत्ता/उत्पन्न/खर्च तपशील**

**(अ)–गै.अ. यांच्या पत्नीची परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता** रू. १,२६,५२८/–

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | परिक्षण कालावधी आरंभी शिल्लक | १,२६,५२८ |
| २ | श्री. साई दर्शन को.ऑ.हौ.सोसा, रुम नं. २०३, काल्हेर, ग्रामपंचायत ता. भिवंडी जि. ठाणे | ०० |
| ३ | श्री. साई दर्शन को.ऑ.हौ.सोसा, रुम नं. २०४, काल्हेर, ग्रामपंचायत ता. भिवंडी जि. ठाणे | ०० |
| ४ | आठ गुंठे जमिन घरासह ( मालवण, जि. सिंधुदुर्ग येथील जमीन ) | ०० |
| ५ | परिक्षण कालावधी पुर्वी खरेदी केलेले सोने | ०० |
| | एकुण | १,२६,५२८ |

**(ब)– गै.अ. यांच्या पत्नीची परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता–** रु.९६,९६,१४७/–

| अ.क्र. | तपशील | रूपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं. ई/०२०३, लक्ष्मी नारायण रेसीडेन्सी खरेदी | ३०,७७,९८० |
| २ | साई दर्शन प्लॅट न.२०१, काल्हेर, भिवंडी खरेदी | ४,००,००० |
| ३ | बॅकेची अखेरची शिल्लक | ९,५४,२८२ |
| ४ | मारुती सुझुकी कंपनीची रिटझ मोटर कार खरेदी | ४,५८,९३८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | पी.एल.आय. मध्ये भरलेली रक्कम | ७९,२६१ |
| ६ | एच.डी.एफ.सी. लाईफ पॉलीसीमध्ये केलेली गुंतवणूक | २,०५,००० |
| ७ | एल.आय.सी. पॉलीसी मध्ये भरलेली रक्कम | १,२१,०८३ |
| ८ | घरझडती मध्ये शिल्पा भोईर यांनेकडे मिळालेली रोख रक्कम | ६,५३,२२५ |
| ९ | एन.के.जी.एस. बँकेमधील एफ.डी. मध्ये केलेली गुंतवणूक | ११,५०,००० |
| १० | शेअर्स मध्ये केलेल्या गुंतवणूकी बाबत | ८,९६,३७३ |
| ११ | म्युचूअल फंडामध्ये केलेली गुतवणूक | २,३२,००० |
| १२ | सोने खरेदी | १,६७,८१३ |
| १३ | आर.डी. मध्ये केलेली गुंतवणूक | १,०६,४०० |
| १४ | एच.डी.एफ.सी. बँकेमधील मुदतठेवी | ८१,६४२ |
| १५ | घर झडतीमधील चल-अचल मालमत्ता | ३,०४,१५० |
| | एकूण | ९६,९६,१४७ |

## (क)- गै.अ. यांच्या पत्नीचा उत्पन्नाचा तपशिल - रु.१,२८,१७,३९५/-

| अ.क. | तपशील | रूपये |
|---|---|---|
| १ | निव्वळ वेतन | २८,२७,५९७ |
| २ | हॉस्पीटल मधील मिळालेले मानधन | ५५,२०,०७७ |
| ३ | बँक खात्यावरील मिळालेले व्याज | १,३५,४५६ |
| ४ | मारुती सुझूकी कंपनीची रिटझ मोटर कार खरेदी | ४,२१,००० |
| ५ | एन.के.जी.एस. बँकेमधील एफ.डी. मधील मिळालेले व्याज रक्कम | २,०८,५५१ |
| ६ | एन.के.जी.एस. बँकेमधील एफ.डी. व्याजासहीत मिळालेली रक्कम | १,०२,१६१ |
| ७ | घर भाडे तुन मिळालेली रक्कम | २,४६,००० |
| ८ | मुदतठेवीतुन मिळालेले व्याज. | ५,९६५ |
| ९ | फ्लॅट नं. ई/०२०३, लक्ष्मी नारायण रेसीडेंन्सीसाठी घेतलेले गृहकर्ज | २५,००,००० |
| १० | शेअर्सवर मिळालेला फायदा | ८,२४,०८९ |
| ११ | एच.डी.एफ.सी. बँकेमधील मुदतठेवीवर मिळालेले व्याज | १,७२२ |
| १२ | आवर्ती ठेव (आर.डी) वर मिळालेले व्याज | २४,७६१ |
| | एकूण | १,२८,१७,३९५ |

## (ड)- गै.अ. यांच्या पत्नीचा खर्चाचा तपशिल - रु.८६,३०,१२१/-

| अ.क. | खर्च | रूपये |
|---|---|---|
| १ | नाशवित खर्च | १०,००,११४ |
| २ | हॉस्पीटलचे मानधन, घरभाडे उत्पनावरील आयकर कपात खर्च | १५,०९,२८२ |
| ३ | साई दर्शन फ्लॅट न.२०१, काल्हेर, भिवंडी नोंदणी खर्च | २०,६३० |
| ४ | मारुती सुझूकी कंपनीची रिटझ मोटर कार इंधन खर्च | १६,१०० |
| ५ | मारुती सुझूकी कंपनीची रिटझ मोटर कार विमा खर्च | ७,३१७ |
| ६ | हस्तीणी -विपाशा को.ऑ.हौ.सो.लि. काल्हेर मेन्टनन्स व मालमत्ता खर्च | ४९,०९५ |
| ७ | मौजे कुभांरमाठ, ता.मालवण, सिंधुदुर्ग येथील जमीनीचा मालमत्ता कर खर्च | ९१० |

श्री. अमोल बबन शिंदे यांचा दिनांक १७/०३/२०२३ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु.....

| | | |
|---|---|---|
| ८ | लक्ष्मीनारायण रेसिडन्सी ठाणे मेन्टनन्स खर्च :– | १,२३,३७२ |
| ९ | मारुती सुझुकी कंपनीची रिट्झ मोटर कार कर्जाची परतफेड | ४,९०,६४७ |
| १० | एन.के.जी.एस. बँकेमधील एफ.डी. मध्ये भरलेली रक्कम | १,००,००० |
| ११ | दोन मुलांचे शिक्षणाकरीता भरलेली रक्कम | ३,५७,१२५ |
| १२ | गृह कर्ज युनियन बँक ऑफ इंडिया ठाणे पश्चिम शाखा ठाणे :– | ४,८५,५२१ |
| १३ | लक्ष्मीनारायण रेसिडन्सी ठाणे येथील गृहकर्जाची परतफेड | ११,४३,०६२ |
| १४ | मुद्राक / नोंदणी – फ्लॅट न. ई /०२०३, लक्ष्मी नारायण रेसीडेंन्सी | २,५३,०८० |
| १५ | मालमत्ता कर खर्च श्री साई दर्शन | ९,९२० |
| १६ | मालमत्ता कर खर्च सागर अपा. | १२,५१० |
| १७ | कोटक लाईफ इन्सुरन्स प्रिमियम मध्ये भरलेली रक्कम | ७५,००० |
| १८ | शेअर्स डि.पी. खाते शुल्क, लिगल फी, वैद्यकिय उपकरणे यासाठी केलेला खर्च रक्कम | १२,२६,२७६ |
| १९ | पती नरेंद्र भोईर यांना धनादेशाव्दारे दिलेली रक्कम :– | १,२४,००० |
| २० | दिर श्री प्रशांत व सासरे श्री रत्नाकर भोईर यांना धनादेशाव्दारे दिलेली रक्कम | ५६,००० |
| २१ | डॉ. प्रदिप साळवी यांना धनादेशाव्दारे दिलेली रक्कम | ४,७०,००० |
| २२ | गोवर मांगल्य मितकास. यांना केलेली आर्थीक मदत | ३,००,००० |
| | एकूण | ८६,३०,१२१ |

तरी वर नमुद प्रमाणे गै.अ. नरेंद्र रत्नाकर भोईर व त्यांची पत्नी शिल्पा भोईर यांचे ''उत्पन्न'', ''खर्च'' व ''मालमत्ता'' हे असुन त्याबाबत एकत्रित स्थिती खालीलप्रमाणे निष्पन्न झालेली आहे व गै.अ. नरेंद्र रत्नाकर भोईर व त्यांची पत्नी शिल्पा भोईर यांच्या एकत्रित अपसंपदेची गणना खालीलप्रमाणे आहे.

**अपसंपदेची गणना**

| | | नरेंद्र भोईर | शिल्पा भोईर | एकूण % |
|---|---|---|---|---|
| १ | दि. १८/०३/२०१४ रोजी असलेली मालमत्ता | २६,५४,२१५ | ९६,९६,१४७ | १,२३,५०,३६२ |
| २ | दि. १२/०३/२००७ रोजी पुर्वी असलेली मालमत्ता | २,१२,१३५ | १,२६,५२८ | ३,३८,६६३ |
| ३ | परिक्षण कालावधीतील एकुण मालमत्ता | २४,४२,०८० | ९५,६९,६१९ | १,२०,११,६९९ |
| ४ | परिक्षण कालावधीतील एकुण खर्च | २३,३१,१७७ | ८६,३०,१२१ | १,०९,६१,२९८ |
| ५ | परिक्षण कालावधीत एकुण मालमत्ता व खर्च ( ३ + ४ ) | ४७,७३,२५७ | १,८१,९९,७४० | २,२९,७२,९९७ |
| ६ | परिक्षण कालावधीतील एकुण उत्पन्न | २९,९०,४७० | १,२८,१७,३९५ | १,५८,०७,८६५ |
| ७ | अपसंपदा (D.A) = (५–६) | १७,८२,७८७ | ५३,८२,३४५ | ७१,६५,१३२ |
| ८ | अपसंपदेची टक्केवारी = (D.A / Toal Income x 100) | ५९.६१ % | ४१.९९% | ४५.३२% |

श्री. अमोल बबन शिंदे यांचा दिनांक १७/०३/२०२३ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु.....

सदर उघड चौकशीमध्ये गैरअर्जदार व त्यांची पत्नी यांच्या अपसंपदेची गणना केली असता गैरअर्जदार नरेंद्र रत्नाकर भोईर व पत्नी नामे सौ. डॉ. शिल्पा नरेंद्र भोईर यांचे एकुण उत्पन्न, मालमत्ता, व खर्चाबाबत तसेच उपलब्ध व प्राप्त कागदपत्रावरुन यातील गैरअर्जदार नरेंद्र भोईर यांचे परिक्षण कालावधी (मार्च २००७ ते मार्च २०१८) मध्ये एकूण उत्पन्न रू. २९,९०,४७०/— आहे. परिक्षण कालावधीतील गै.अ. नरेंद्र भोईर यांची एकुण मालमत्ता रू. २४,४२,०८०/— इतकी आहे व परिक्षण कालावधीतील गै.अ. नरेंद्र भोईर यांचा एकूण खर्च रू. २३,३१,१७७/— असुन गै.अ. नरेंद्र भोईर यांची वैयक्तिक संपादीत केलेली अपसंपदा ही रु. १७,८२,७८७/— (५९.६१ टक्के) इतकी आहे

तसेच गै.अ. नरेंद्र भोईर यांची पत्नी सौ. शिल्पा नरेंद्र भोईर या ठाणे महानगर पालीकेमध्ये वैद्यकिय अधिकारी म्हणुन नोकरीस असुन त्या अन्य वेळेत खाजगी दवाखान्यात प्रॅक्टीसव्दारे मिळालेले त्यांचे (गै.अ. नरेंद्र भोईर यांच्या परिक्षण कालावधीतील) एकणू उत्पन्न रु. १,२८,१७,३९५/— इतके आहे. त्यांची एकुण मालमत्ता रु.९५,६९,६१९/— इतकी आहे. एकूण खर्च रु. ८६,३०,१२१/— इतका असुन गै.अ. यांच्या पत्नीने रु.५३,८२,३४५/— ( ४१.९९ टक्के) किमतीची अपसंपदा स्वत:च्या नावे बाळगली आहे.

यावरून गैरअर्जदार नरेंद्र रत्नाकर भोईर व पत्नी सौ. डॉ. शिल्पा नरेंद्र भोईर हे दोन्हीही शासकिय नोकरीत असल्याने व एकत्रीत रहात असल्याने त्यांचा सर्व प्रकारच्या ज्ञात स्त्रोतातून मिळालेल्या उत्पनाचा विचार करून त्यांचे दोघाचा खर्च व एकूण मालमत्ता रू. २,२९,७२,९१७/— रक्कम यामधुन दोघांचे एकुण उत्पन्न रू. १,५८,०७,८६५/— वजा जाता त्यांच्याकडे ज्ञात उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत अशी रू. ७१,६५,१३२/— (४५.३२ टक्के) इतकी अपसंपदा गैरमार्गाने संपादीत केल्याचे निष्पन्न होते व वर नमुद दोघांची अपसंपदा रू. ७१,६५,१३२/— यामधील रु.५३,८२,३४५/— एवढी अपसंपदा गैरअर्जदार यांची पत्नी डॉ शिल्पा भोईर यांनी स्वत:च्या नावे बाळगुन गैरअर्जदार यांना प्रोत्साहन दिल्याचे चौकशी अंती व उपलब्ध कागदोपत्री पुरावा यावरून निर्दशनास आले.

तरी वरील प्रमाणे केलेल्या चौकशी दरम्यान गैरअर्जदार नरेंद्र रत्नाकर भोईर यांनी परिक्षण कालावधीमध्ये भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर आणि ज्ञात उत्पनापेक्षा अधिक किमंतीची अशी रु. १७,८२,७८७/— किमंतीची अपसंपदा संपादित केली म्हणून गैरअर्जदार नरेंद्र रत्नाकर भोईर यांनी **भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ई) सह कलम १३ (२)** अन्वये गुन्हा केला आहे व गैरअर्जदार नरेंद्र भोईर यांची पत्नी श्रीमती डॉ. शिल्पा भोईर यांनी देखील रु.५३,८२,३४५/— ची किमंतीची स्वत:च्या नावे बाळगुन लोकसेवक नरेंद्र भोईर यांना हेतुपुरस्सर व बेकायदेशीरपणे अपसंपदा मिळवणेसाठी प्रोत्साहन दिले म्हणून श्रीमती डॉ. शिल्पा भोईर यांनी **भारतीय दंड संहिताचे कलम १०९** प्रमाणे गुन्हा केला आहे. म्हणुन गैरअर्जदार लोकसेवक नरेंद्र रत्नाकर भोईर व त्यांची पत्नी श्रीमती डॉ. शिल्पा नरेंद्र भोईर यांच्या विरूध्द माझी सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

माझा वर नमुद प्रथम खबरी जबाब मी वाचून पाहिला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( हर्षल चव्हाण )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

( अमोल शिंदे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned wit

(५४)

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ चौकशी अंती.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीचा थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील लोकसेवक नरेंद्र रत्नाकर भोईर यांनी लोकसेवक या नात्याने कर्तव्य पार पाडताना अंतर्गत दि. १२/०३/२००६ ते दि. १८/०३/२०१४ रोजी या कालावधीमध्ये भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर आणि ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किंमतीची अशी रु. ७८,८२,८२८/- रक्कमेची अपसंपदा संपादित केली तसेच लोकसेवक यांची पत्नी श्रीमती डॉ. शिल्पा भोईर यांनी देखील रु. ५३,८२,३४५/- किंमतीची अपसंपदा स्वतःच्या नावे बाळगुन लोकसेवक नरेंद्र भोईर यांना हेतुपुरस्सर व बेकायदेशीरपणे अपसंपदा मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिले म्हणून लोकसेवक नरेंद्र भोईर व पत्नी श्रीमती शिल्पा भोईर यांचे विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. १९८८ चे कलम १३(१)(ई), कलम १३(२) सह भा.द.वि. क. १०९ प्रमाणे गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील निवेदनावरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासाकरिता घेतला, ...

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ हर्षल दत्तात्रय चव्हाण,
पदनाम Rank ........ सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग.
Posting
Code No. of I.O. ........

15. 1. न्यायालयात सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. ऑफिस प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with